| | | | |
|---|---|---|---|
| **MHTH190027412023** | दाखल तारीख | : | ०५.१२.२०२३ |
| | नोंदणी तारीख | : | ०५.१२.२०२३ |
| | निकाल तारीख | : | ११.०८.२०२६ |
| | कालावधी | : | ०२ व. ०८ म. ०६ दि. |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १३७७/२०२३** **नि.क्र.१८**

**भाग अ***

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१) ]

| | |
|---|---|
| **डहाणू येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, डहाणू यांचे न्यायालयात**<br>( पिठासीन अधिकारी : एस.व्ही. पावसकर ) | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. –९८/२०२३<br>महाराष्ट्र शासन मार्फत **वाणगाव पोलिस स्टेशन** |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०८.२०२६ |
| **प्रकरण क्रमांक**<br>तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | **संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक १३७७/२०२३**<br>महाराष्ट्र शासन मार्फत **वाणगाव पोलिस स्टेशन**<br>(फिर्यादी–श्री. विशंभर नरहरी शेवाळे) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्रीमती. व्ही. आर. संखे ,सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **भरत दत्तात्रय बारी,**<br>वय – ५२ वर्षे, धंदा -मजुरी,<br>रा.वाणगाव पाटेपाडा, ता.डहाणु, जि.पालघर. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री.एम. व्ही. चोरडीया पक्षातर्फे वकिल. |

**भाग ब ***

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२) ]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २०.१०.२०२३ |
| पहिल्या खबरीची तारीख | २०.१०.२०२३ |

| | |
|---|---|
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०५.१२.२०२३ |
| प्रतिकथन निश्चितीची तारीख | १८.१०.२०२३ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०६.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०८.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | --------- |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भरत दत्तात्रय बारी | फौ.प्र.सं.कायदा कलम ४१ (१) (अ) ची नोटीस दिली. | १८/१०/२०२४ | महाराष्ट्र दारु बंदी कायदा , १९४९ चे कलम ६५ (ई) नुसार | निर्दोष | --- | -- |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | फौजदारी प्रक्रिया संहिता |
| महाराष्ट्र दारु बंदी कायदा , १९४९ | महाराष्ट्र दारु बंदी कायदा |

**भाग क ***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३) ]**

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | संतोष हरीनाथ बनीया (निशाणी क्र.०८ लगत) | घटनास्थळ पंच साक्षीदार. |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्षः**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१५ | घटनास्थळ जप्ती पंचनामा (सहीस निशाणी देण्यात आले) |
| २ | नि.क्र.१७ | सी. ए. रिपोर्ट |

**ड. महत्वाच्या वस्तुः**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक -- | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय
## (दिनांक ११.०८.२०२६ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५ (ई), अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२. आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये नि.क्र.०८ प्रमाणे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपीने त्यांचे वरील आरोप नाकारले व खटल्याची चौकशी घेण्याची मागणी केली.

३. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ चे निवेदन वगळण्यात आले. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विधिज्ञ श्री.एम. व्ही. चोरडीया यांचा युक्तीवाद ऐकला. याकामी खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो की, आरोपीने दिनांक | नकारार्थी. |

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | २०/१०/२०२३ रोजी १९:१० वाजता वाणगाव पाटेपाडा,ता. डहाणु, जि.पालघर येथे रहात्या घराच्या पाठीमागील पडवीत तुमच्या ताबेकब्जात एक प्लॅस्टीकचा सफेद रंगाचा ०५ लिटर मापाचा कॅनमध्ये ०५ लिटर गैर कायदयाची गावठी हातभट्टीची दारु र.रु.३००/- किंमतीचा दारुबंदी गुन्हयाचा माल कोणत्याही प्रकारचा परवाना नसतांना बेकायदेशीररित्या ताबेकब्जात मिळून आला व त्याद्वारे कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदयाअंतर्गत् गुन्हा केला ? | |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>**कारणमिमांसा**</u>

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> :-**

४. आरोपीवर ठेवण्यात आलेला आरोप शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच साक्षीदार नामे संतोष (अ.सा.क्र.१) यांची साक्ष नि.क्र.०८ लगत नोंदविण्यात आलेली आहे. नि.क्र. १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

५. अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच साक्षीदार संतोष (अ.सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, दिनांक २०/१०/२०२३ रोजी वाणगाव पोलिसांनी त्यांना पाटेपाडा येथे बोलाविले होते. त्यावेळी त्यांच्यासोबत दुसरा पंच कुणाल राऊत हे होते. पंचनामासाठी ते भरतच्या घरी गेले होते. त्या ठिकाणी पोलिसांनी पिशवीमध्ये काहीतरी बाटली जमा करुन ठेवल्या होत्या त्यामध्ये काय होते हे त्यांना आठवत नाही. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष दारु जप्त केली किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. त्यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यामधील सही ओळखुन त्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदार यांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले परंतु अभियोग पक्षास उपयुक्त अशी कबुली मिळालेली नाही.

६. आरोपी पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी असे मान्य केले आहे की, दुसरे पंच कुणाल राऊत यांचा वाणगाव येथे परवाना धारक बीयर शॉपी आहे. घटनास्थळ पंच साक्षीदार फळे व भाजी विकण्याचा व्यवसाय वाणगाव रेल्वे स्टेशनच्या गेटजवळ करतो. त्याच्या बाजुला वाणगाव पोलिस स्टेशनची चौकी आहे. पंच साक्षीदार पंचनामाला किती वाजता गेले होते व किती वाजता आले हे सांगता येणार नाही. पंच साक्षीदार यांनी यापुढे असे ही मान्य केले आहे की, पंचनामासाठी ज्या घरी गेले होते त्या घराचे चतुर्सिमा त्यांनी सांगितलेल्या नाहीत. त्यांनी कोणत्याही वस्तु पाहिलेल्या नसुन पोलिसांनी सही करण्यास सांगितले म्हणुन सही केली आहे असे त्यांच्या साक्षीपुराव्यामध्ये आलेले आहे.

७. अभियोग पक्षातर्फे दाखल केलेल्या एकंदरीत साक्षीपुराव्यातुन असे दिसुन येते की, अभियोग पक्षातर्फे स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आला नाही. त्यांनी ज्या घरात छापा टाकले त्या घराच्या चतुर्सिमा त्यांना सांगता आलेले नाही. तसेच पंचनामाला किती वाजता गेले व किती वाजता आले याबाबत त्यांनी सांगितलेले नाही. तसेच त्यांनी कोणत्याही वस्तु पाहिलेल्या नाही व पोलिसांनी सही करण्यास सांगितल्यामुळे त्यांनी सही केली. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष दारु जप्त केली याबाबत त्यांना आठवत नसल्याचे सांगितले आहे. तसेच प्रस्तुतकामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल आरोपीच्या घरातुन जप्त केला याबाबत पुरावा दाखल केलेला नाही. जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही.

८. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल नि.क्र.१७ वर दाखल केलेला आहे. घटना दि.२०/१०/२०२३ रोजी घडलेली आहे. नमुना बाटली दि.३०/१०/२०२३ रोजी रासायनिक प्रयोगशाळा कलीना सँताक्रुझ मुंबई येथे पाठविण्यात आली होती. दि.२०/१०/२०२३ ते दि.३०/१०/२०२३ रोजीपर्यंत सदरची नमुना बॉटली कोणाच्या ताब्यात होती. सदर नमुना बाटली इतर मुद्देमालामध्ये मिसळु नये म्हणुन कोणती खबरदारी घेण्यात आली. याबाबत अभियोग पक्षाने अभिलेखावर काहीही आणलेले नाही. प्रस्तुतकामी जप्त केलेली गावठी हात भट्टीची दारु आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली असे अभियोग पक्षाने सर्व संशयाच्या पलीकडे जावुन शाबित केलेले नाही. त्यामुळे उपलब्ध

पुराव्यावरुन आरोपीला शिक्षा देणे योग्य व न्यायाचे होणारे नाही. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सर्व संशयापलीकडे जावुन शाबित केलेला नाही. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविते. सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्र. २ करीताः–</u>**

९. अभियोग पक्षाने महाराष्ट्र दारुबंदी कायद्यातील कलम ६५ (ई) ची तत्वे सर्व संशयापलीकडे जावून शाबीत केलेली नाहीत. त्यामुळे आरोपीला प्रस्तुतच्या खटल्यातुन सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरेल. जप्त केलेला मुद्देमाल म्हणजेच गावठी हात भट्टीची दारु ही अपील कालावधीनंतर नाश करणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. वर नमुद कारणांमुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१. आरोपी नामे भरत दत्तात्रय बारी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम ६५ (ई) अन्वयेच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.
२. आरोपीचा पुर्वीचा जामिन व जात मुचलका रद्द करण्यात येत आहे.
३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी रुपये २५,०००/– चा जामिन व जात मुचलका सादर करावा.
४. जप्त मुद्देमाल अपिल कालावधी संपल्यानंतर नियमानुसार नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

PAWASKAR SHEETAL VASANT
Digitally signed by PAWASKAR SHEETAL VASANT
Date: 2026.08.11 17:53:13 +0530

ठिकाणः डहाणू. (एस. व्ही. पावसकर)
दिनांक :–११.०८.२०२६. न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, डहाणू